दिनांक 02/04/2026

## प्रसिध्दी पत्रक

**आलोसे** - श्री.रुपचंद धरमचंद बनकर, वय 47 वर्षे, धंदा-नोकरी,पद-मजुर, नेमुणक- झोन क्रं.06, पाणीपुरवठा वसुली विभाग, सिडको महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर (वर्ग-4) यांनी तक्रारदार यांचेकडुन 27,500/- लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिडको छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री.रुपचंद धरमचंद बनकर, वय 47 वर्षे, धंदा-नोकरी,पद-मजुर, नेमुणक- झोन क्रं.06, पाणीपुरवठा वसुली विभाग, सिडको महानगरपालिका, छत्रपती संभाजीनगर (वर्ग-4). |
| लाच मागणी रक्कम | 27,500/- ( सत्तावीस हजार, पाच से रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | तडजोडीअंती 27,500/- ( सत्तावीस हजार, पाच से रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्रीमती संगिता पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री. राजीव तळेकर, पोलिस उप अधीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काम केलेचे प्रमाणपत्र देणेसाठी. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार हे महाराष्ट्र युवा शक्ती श्रमिक कामगार संघटनेचे अध्यक्ष आहेत. संघटनेच्या वतीने महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ योजनेचा ऑनलाईन फार्म भरुन देणे करिता मदत करतात. त्यांचेकडे 50 कामगार हे बांधकाम कामगार नोंदणी करणे करिता आले आहे. सदर योजनेची ऑनलाईन नोंदणी करिता महानगरपालिका यांचे मार्फत बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काम केल्याचा प्रमाणपत्राची आवश्यकता असते. त्याकरिता आलोसे यांनी 550/- रु. प्रत्येकी प्रमाणपत्र करिता असे 50 कामगारांचे 27500/-रु. प्रमाणपत्राची मागणी केली. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 01/04/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आलोसे श्री. रुपचंद बनकर यांनी तक्रारदार यांना बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काम केलेचे प्रमाणपत्र देणेसाठी 550/- रु. प्रत्येकी प्रमाणपत्र करिता असे 27,500/- हजार रुपयांची लाच मागणी करून, स्वीकारण्याचे पंचांसमक्ष मान्य केले.<br>लाच मागणी नंतर दिनांक 02/04/2026 रोजी शासकीय पंचासह सापळा कारवाई दरम्यान झोन नं.6 परिसरात सिडको महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार यांच्याकडून आलोसे श्री. रुपचंद बनकर यांनी 27500/-रुपये लाचेची रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष स्विकारल्याने आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.<br>आलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन सिडको, छत्रपती संभाजीनगर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगिता पाटील यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह/दिपक इंगळे, पोअं-सचिन बारसे, रामेश्वर गोरे, चालक- पो.अंम.रामेश्वर ताटे, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.